# पुणे ग्रामीण जिल्हा पोलीस भरती-2016

1. **डेसिबल या एककाने काय मोजतात?**

   अ) प्रकाश   ब) समुद्राची खोली   क) आवाजाची तीव्रता   ड) उष्णता

2. **खालीलपैकी मूळ संख्या कोणती?**

   अ) 64   ब) 71   क) 80   ड) 99

3. **10 रू. नोटांच्या पुडक्यात 97,256 पासून 97,280 पर्यंत क्रमांकाच्या नोटा आहेत, तर एकूण किती रक्कम आहे?**

   अ) 240   ब) 300   क) 250   ड) 245

4. **राजीव गांधी खेलरत्न पुरस्काराचे पहिले मानकरी म्हणून कोणाचा उल्लेख करावा लागेल?**

   अ) विश्वनाथन आनंद   ब) सचिन तेंडुलकर
   क) सायना नेहवाल   ड) विराट कोहली

5. **कोणत्या फुलपाखराला महाराष्ट्र शासनाने राज्य फुलपाखरू म्हणून घोषित केले आहे?**

   अ) ब्लू मॉरमॉन   ब) ब्लु बॉरबॉन   क) ब्लु जॉरजॉन   ड) ब्लु नाईल

6. **या वायुस हसविणारा वायू म्हणतात.**

   अ) नायट्रस ऑक्साईड   ब) नायट्रीक ऑक्साईड
   क) नायट्रीक ॲसिड   ड) नायट्रस ॲसिड

7. **युसूफभाई व मंदार या टोळ्यांशी झालेल्या युध्दात अकबराच्या नवरत्नापैकी .......... हा मारला गेला होता.**

   अ) अबुल फजल   ब) बिरबल   क) अबुल फैजी   ड) तोडरमल

8. **खालीलपैकी कोणता किल्ला शिवाजी महाराजांनी बांधला आहे?**

   अ) शिवनेरी   ब) जंजीरा   क) सिंधुदुर्ग   ड) पन्हाळा

9. **गेट वे ऑफ इंडिया, मुंबई हे कोणत्या वर्षी बांधण्यात आले?**

   अ) 1881   ब) 1891   क) 1901   ड) 1911

10. **सेंट्रल वॉटर ॲन्ड रिसर्च स्टेशन राज्यात ........ येथे कार्यरत आहे?**

    अ) पुणे   ब) मुंबई   क) वर्धा   ड) रत्नागिरी

**11. मराठी वृत्तपत्राचे दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांचे ..... हे जन्मस्थान रत्नागिरी जिल्ह्यात आहे?**

अ) पोभुर्ले ब) पावस क) गणपतीपुळे ड) जयगड

**12. महाराष्ट्र एक्सप्रेस ही रेल्वे कोठून कोठे धावते?**

अ) कोल्हापूर-गोंदिया ब) पुणे-मुंबई क) मुंबई-कोल्हापूर ड) कोल्हापूर-सोलापूर

**13. सुधाजवळ मेघाच्या तिप्पट रूपये आहेत. दोघींचे मिळून 28 रूपये होतात, तर सुधाजवळ मेघापेक्षा किती रूपये जास्त आहेत?**

अ) 14 ब) 7 क) 12 ड) 16

**14. लोकमान्य : टिळक :: जयप्रकाश नारायण :?**

अ) लोकनायक ब) महर्षी क) महात्मा ड) पितामह

**15. नाकाला मिरची झोंबणे या वाक्यप्रचाराचा अर्थ ओळखा.**

अ) जिव्हारी लागणे ब) खुप राग येणे क) तिखट लागणे ड) शरण जाणे

**16. प्रदुषण करणाऱ्याकडून नुकसान भरपाई करून घेण्यासाठी भारताने .......मध्ये हरित न्यायालय सुरू केले.**

अ) 2010 ब) 2007 क) 2008 ड) 2005

**17. खालीलपैकी कोणत्या पर्यायातील वनस्पतींचा वापर जैविक इंधन बनविण्यासाठी केला जातो?**

अ) सुबाभळ व निलगिरी ब) करंज व सोयाबिन

क) जाट्रोफा व करंज ड) जाट्रोफा व निलगिरी

**18. डॉटस् (DOTS) हा उपचार कोणत्या आजाराच्या रूग्णांसाठी आहे?**

अ) पोलीओ ब) एडस् क) हेपॅटायटीस ड) क्षय

**19. स्वयंचलित वाहनातून कोणता विषारी वायु बाहेर पडतो?**

अ) कार्बन मोनॉक्साईड ब) मिथेन क) कार्बन डायऑक्साईड ड) ओझोन

**20. माठामधील पाणी गार होण्यामागे खालीलपैकी कोणते तत्त्व आहे?**

अ) संवहन ब) बाष्पीभवन क) रासायनिक प्रक्रिया ड) भाजलेल्या मातीचा गुणधर्म

**21. लसीकरणानंतर (व्हॅक्सीनेशन) शरीरामध्ये ....... तयार होतात?**

अ) टॉक्झीन्स ब) ॲन्टिबॉडीज् क) लिम्फ ड) प्लाझ्मा

**22. गंधकासोबत रबर तापवुन ते कठीण बनविण्याच्या क्रियेस खालीलपैकी कोणती संज्ञा आहे?**

अ) व्हल्कानायझेशन ब) सफपोनिफिकेशन क) हायड्रोजनेशन ड) पॉलिमरायझेशन

**23. कार्बन डेटिंग ही .......... निश्चित करण्याची शास्त्रीय पध्दत आहे?**

अ) कार्बनची जोडी ब) कोळशाचे साठे क) वस्तुचे वय ड) कार्बनची मात्रा

**24. ओझेन वायुच्या थरामुळे कोणते घातक किरण पृथ्वीवर येवु शकत नाही?**

अ) इन्फ्रारेड किरण ब) अल्ट्राव्हायलेट किरण

क) क्ष किरण ड) विश्व किरण

**25. नीती ( नॅशनल इन्स्टिटयुट फॉर ट्रान्स्फॉर्मिंग इंडिया) आयोगाची स्थापना केंव्हा करण्यात आली?**

अ) 1 जानेवारी 2014 ब) 1 एप्रिल 2015 क) 1 जून 2014 ड) 1 जानेवारी 2015

**26. नक्षलबारी हे गाव कोणत्या राज्यामध्ये आहे?**

अ) बिहार ब) झारखंड क) आंध्रप्रदेश ड) पश्चिम बंगाल

**27. तुमचे तोंड वायव्य दिशेस असल्यास तुमच्या डाव्या हाताला कोणती दिशा येईल?**

अ) ईशान्य ब) वायव्य क) नैऋत्य ड) आग्नेय

**28.** $\frac{9}{2}, \frac{18}{4}, \frac{36}{16}, \frac{72}{?}$

अ) 64 ब) 526 क) 256 ड) 625

**29. अझलन शहा कप हा कोणत्या खेळाशी संबंधीत आहे?**

अ) क्रिकेट ब) फुटबॉल क) बॅडमिंटन ड) हॉकी

**30. 5 / 0.125 = ?**

अ) 30 ब) 20 क) 40 ड) 25

**31. गाविलगड किल्ला कोणत्या जिल्ह्यात आहे?**

अ) सातारा ब) अमरावती क) नागपूर ड) बुलढाणा

**32. नाग हे क्षेपणास्त्र ......... यांच्या विरोधात काम करते?**

अ) विमान ब) जहाज क) पाणबुडी ड) रणगाडा

**33. ऑपरेशन मुस्कान काय आहे?**

अ) चेहऱ्याची शस्त्रक्रिया ब) भारतीय लष्काराची मोहिम

क) हरवलेल्या बालकांचा शोध ड) टी.व्ही.सिरीयल

**34. पोलीस पाटील यांची नियुक्ती कोण करतो?**

अ) विभागीय आयुक्त ब) जिल्हाधिकारी क) उपविभागीय अधिकारी ड) तहसिलदार

**35. डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेची स्थापना कोणी केली?**

अ) डॉ.बाबासाहेब आंबेडकर ब) दादाभाई नौरोजी

क) महर्षी वि.रा.शिंदे ड) पंडिता रमाबाई

**36. 7 कप व 5 बशींची एकूण किंमत 81 रूपये आहे. 5 कप व 7 बशींची एकूण किंमत 75 रूपये आहे तर 1 कप 1 बशीची किंमत किती?**

अ) 12 रू ब) 13 रू क) 14 रू ड) 15 रू

**37. माधव चितळे समिती कोणत्या विषयाशी संबंधित आहे?**

अ) आयात-निर्यात ब) बेळगाव सिमावाद क) जलसिंचन ड) क्रिकेट गैरव्यवहार

**38. मितव्ययी या शब्दाचा अर्थ काय आहे?**

अ) कमी बोलणारा ब) रागवणारा क) न रागावणारा ड) काटकसरीने राहणारा

**39. W.T.O. चे संपुर्ण नाव काय आहे?**

अ) वर्ल्ड टुरिझम ऑरगनायझेशन ब) वर्ल्ड टेररिस्ट ऑरगनायझेशन

क) वर्ल्ड ट्रेड ऑरगनायंझेशन ड) वर्ल्ड ट्राफिक ऑरगनायझेशन

**40. खालीलपैकी कोणती जोडी चुकीची आहे.**

अ) संतूर-शिवकुमार ब) शहनाई-बिसमिल्ला खान

क) सतार-अमजदअली ड) तबला-झाकिर हुसेन

**41. खालील कायद्यापैकी दंडसंहिता कोणती आहे?**

अ) IPC ब) Cr.PC क) CPC ड) भारतीय पुरावा कायदा

**42. खालीलपैकी विसंगत पर्याय ओळखा.**

अ) तारापूर ब) नरोरा क) कोटा ड) नोयडा

**43. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेतील सदस्य संख्या किती आहे?**

अ) 288 ब) 78 क) 188 ड) 278

**44. खालीलपैकी कोणते पद केवळ पदोन्नतीनेच भरले जाते?**

अ) पोलीस उपनिरीक्षक ब) सहाय्यक पोलीस निरीक्षक

क) पोलीस उपअधिक्षक ड) सहाय्यक पोलीस आयुक्त

**45. ग्रीन हाऊस इफेक्ट कशाशी संबंधित आहे?**

अ) हरितक्रांती ब) दुग्धक्रांती क) वातावरणातील बदल ड) मानवी आजार

**46. घरमालकाने घराचे मासिक भाडे 10 टक्क्याने वाढवले. पूर्वीचे भाडे 350 रूपये असल्यास आताचे भाडे किती?**

अ) 374 रूपये ब) 385 रूपये क) 375 रूपये ड) 365 रूपये

**47. राम आणि शाम यांच्या वयाची बेरीज 42 वर्षे आहे. राम शाम पेक्षा वयाने 6 वर्षांनी मोठा आहे तर रामचे वय किती?**

अ) 18 वर्षे ब) 20 वर्षे क) 22 वर्षे ड) 24 वर्षे

**48. मी डॉक्टर झालो असतो परंतु मला भरपूर मार्क मिळाले नाहीत. या विधानातील अव्ययाचा प्रकार ओळखा?**

अ) क्रियाविशेषण ब) शब्दयोगी क) उभयान्वयी ड) केलवप्रयोगी

**49. संगणकीय भाषेत WWW चा अर्थ काय?**

अ) World Wide Waste ब) World Wide West

क) World Wide Web ड) World Video Web World

**50. उजनी धरण जलाशयाच्या परिसरात खालीलपैकी कोणते पक्षी मोठ्या प्रमाणात आढळतात?**

अ) मोर ब) माळढोक क) दयाळ ड) रोहित

**51. खाली मांडलेले शब्द शब्दकोशामध्ये (डिक्शनरी) कोणत्या क्रमाने येतील?**

A) Interest B) Income C) India D) Import

अ) BCAD ब) DBCA क) ABCD ड) DCBA

**52. लखीना पॅटर्न खालीलपैकी कशाशी संबंधीत आहे?**

अ) शैक्षणिक सुधारणा ब) पाणी वाटप क) प्रशासन सुधारणा ड) प्रादेशिक असमतोल

**53. रामकृष्ण मिशन या संस्थेची स्थापना ...... यांनी केली.**

अ) रामकृष्ण परमहंस ब) स्वामी दयानंद सरस्वती

क) स्वामी विवेकानंद ड) ईश्वरचंद्र विद्यासागर

**54. त्रिस्तरीय पंचायत राज्यांची संकल्पना कोणत्या समितीने मांडली?**

अ) सरकारीया समिती ब) बी.एम.दांडेकर समिती

क) व्ही.पी.नाईक ड) बलवंतराय समिती

**55. भारतातील ....... या पहिल्या बुलेट ट्रेनसाठी जपान हा देश मदत करीत आहे?**

अ) मुंबई-दिल्ली ब) मुंबई-पुणे क) मुंबई-अमृतसर ड) मुंबई-अहमदाबाद

**56. पहिला महाराष्ट्र भुषण पुरस्कार ........... यांना देण्यात आला आहे.**

अ) डॉ.जयंत नारळीकर ब) पु.ल.देशपांडे क) लता मंगेशकर ड) बाबासाहेब पुरंदरे

**57. सेतुसमुद्रम प्रकल्पामुळे पाल्कची सामुद्रधनी आणि ...... चे आखात जोडले जाईल.**

अ) मन्नार ब) खंभात क) कच्छ ड) सुवेझ

**58. शरावती नदीवरील जोग किंवा गिरसप्पाचा धबधबा हा भारतातील सर्वात मोठा धबधबा कोणत्या राज्यात आहे?**

अ) कर्नाटक ब) महाराष्ट्र क) तामिळनाडू ड) आंध्रप्रदेश

**59. खालीलपैकी कोणते स्थळ नवी दिल्ली येथे नाही?**

अ) कुतुबमिनार ब) शांतिवन क) हुमायून कबर ड) बुलंद दरवाजा

**60. ईशान्य मोसमी वारे ..... या कालावधीत वाहतात.**

अ) मे ते सप्टेंबर ब) डिसेंबर ते फेब्रुवारी क) जुलै ते डिसेंबर ड) जानेवारी ते मे

**61. रायगडावरील शिवरायांच्या समाधीचा जिर्णोध्दार करून व शिवरायांवर पोवाडा लिहून त्यांचे विषयीचा आदरभाव ..... यांनी प्रकट केला.**

अ) लोकमान्य टिळक ब) छत्रपती संभाजी महाराज

क) न्यायमुर्ती रानडे ड) महात्मा फुले

**62. मिठाच्या सत्याग्रहामुळे प्रसिध्दीस आलेले शिरोडे हे गाव कोणत्या जिल्ह्यात आहे?**

अ) रत्नागिरी ब) सिंधुदुर्ग क) ठाणे ड) रायगड

**63. कृष्णा व वेण्णा या दोन नद्यांचा संगम सातारा जिल्ह्यात ....येथे आहे.**

अ) कराड ब) माहुली क) वाई ड) वेळु

**64. सांगली जिल्ह्यातील सागरेश्वर हे अभयारण्य खालीलपैकी कोणासाठी राखीव आहे?**

अ) गवे ब) वाघ क) पक्षी ड) हरिणे

**65. कोरकु जमातीचे लोक खालीलपैकी कोणत्या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आढळतात?**

अ) धुळे ब) नाशिक क) अमरावती ड) रायगड

**66. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना 1923 मध्ये लंडन विद्यापीठाने अर्थशास्त्रातील कोणत्या प्रबंधाबद्दल डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी दिली?**

अ) दि प्रॉब्लेम ऑफ रूपी

ब) दी प्रॉब्लेम ऑफ मनी

क) ॲडमिनिस्ट्रेशन ऑफ दी इस्ट इंडिया कंपनी

ड) दी इव्हालेल्युशन ऑफ प्रिन्सीपल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया

**67. राजर्षी शाहु महाराजांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी कोणते वसतीगृह सुरू केले?**

अ) मिस मेरी वसतीगृह ब) मिस रोझी वसतीगृह

क) मिस क्लार्क वसतीगृह ड) मिस ल्युसी वसतीगृह

**68. राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनात घडुन आलेल्या कोणत्या घटनेमुळे महाराष्ट्रात ब्राम्हणेत्तर चळवळीला चालना मिळाली?**

अ) महार वतन रद्द ब) कुलकर्णी वतन रद्द

क) मागास जातींना राखीव जागा ड) वेदोक्त प्रकरण

**69. भारतीय नौदलाच्या कमांडोना .......... असे नाव आहे.**

अ) कोब्रा ब) ब्लॅक कॅट क) मार्कोस ड) ग्रे हाऊंड

**70. बिहारमधील चंपरण येथील सत्याग्रह कोणत्या पिकाशी निगडीत होता?**

अ) भात ब) ताग क) नीळ ड) ऊस

**71. एका आयाताची लांबी त्यांच्या रूंदीच्या दुप्पट आहे, आयाताचे क्षेत्रफळ 162 चौसेमी असल्यास त्याची लांबी किती असेल?**

अ) 9 सेमी ब) 26 सेमी क) 18 सेमी ड) 16 सेमी

**72. वंदे मातरम् या वृत्तपत्राच्या माध्यमातून ..... यांनी तरूणांची मने क्रांतीकार्याकडे वळविली.**

अ) भुपेंद्रनाथ दत्त ब) अरविंद घोष क) खुदीराम बोस ड) रासबिहारी बोस

**73. सन 1904 मध्ये प्राचिन स्मारक कायदा संमत करण्याचे श्रेय खालीलपैकी कोणास आहे?**

अ) लॉर्ड वेलस्ली ब) लॉर्ड ॲमहस्ट्र क) लॉर्ड चेम्सफर्ड ड) लॉर्ड कर्झन

http://www.adda247.com/mr | Adda247 मराठी App | https://t.me/Adda247Marathi

**74. सम्राट अकबर याचा समकालीन माळव्याचा बाजबहादुर हा उत्तम ... होता.**

अ) कवी ब) चित्रकार क) संगीतकार ड) शिल्पज्ञ

**75. कोणत्या रक्तगटाच्या व्यक्तीचे रक्त सर्व रक्तगटाच्या व्यक्तींना चालते?**

अ) ए ब) बी क) ओ ड) एबी

**76. जायकवाडी प्रकल्प कोणत्या नदीवर आहे?**

अ) गोदावरी ब) तापी क) कृष्णा ड) नर्मदा

**77. महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या जन-वन विकास योजनेला कोणत्या नेत्याचे नाव देण्यात आले आहे?**

अ) डॉ.शामाप्रसाद मुखर्जी ब) अटल बिहारी वाजपेयी

क) पं.दीनदयाळ उपाध्याय ड) गोळवलकर गुरूजी

**78. 30 रूपये डझन या भावाने 30 पेन खरेदी करून नंतर ते सर्व विकले. प्रत्येक पेन 3 रूपयास विकला असेल तर किती टक्के नफा झाला?**

अ) 15 टक्के ब) 17 टक्के क) 20 टक्के ड) 200 टक्के

**79. स्पॉट फिक्सींग संदर्भात क्रिकेट नियामक मंडळात सुधारणा करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ...... ही समिती स्थापन करण्यात आली होती?**

अ) आर.एम.लोढा ब) एच.एल.दत्तू क) पी.सदाशिवम ड) अल्तमास कबीर

**80. उर्दु भाषेचा निर्माता कोण?**

अ) इब्न बतुता ब) महमंद तुघलक क) मिर्झा गालीब ड) अमीर खुसरो

**81. पश्चिम घाटासंबंधीच्या माधव गाडगीळ समितीच्या अहवालाचा अभ्यास करण्यासाठी कोणाच्या अध्यक्षतेखालील अभ्यासगटाची नियुक्ती करण्यात आली होती?**

अ) प्रकाश जावडेकर ब) के.कस्तुरीरंगन क) जयंती नटराजन ड) जयराम रमेश

**82. बोको हराम ही आतंकवादी संघटना कोणत्या देशात सक्रिय आहे?**

अ) अफगाणिस्तान ब) सोमालिया क) नायजेरिया ड) नामिबिया

**83. खालीलपैकी ........ हा इंटरनेटच्या वापरासाठीचा प्रचलित ब्राऊजर आहे.**

अ) मायक्रोसॉफ्ट ऑफिस ब) मायक्रोसॉफ्ट इंटरनेट एक्सप्लोरर

क) विंडोज एक्सप्लोरर ड) नेव्हीगेशन

**84. मीनाच्या वयात 13 वर्षे मिळविली आणि येणाऱ्या बेरजेला 4 ने गुणले**

असता तेव्हा उत्तर 60 आले. तर मिनाचे वय किती?

अ) 1 वर्षे ब) 2 वर्षे क) 3 वर्षे ड) 4 वर्षे

85. 8 स्केअर मिटर = किती स्केअर फुट?

अ) 40.08 स्केअर फुट ब) 46.08 स्केअर फुट

क) 66.08 स्केअर फुट ड) 68.08 स्केअर फुट

86. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ..... देशात आपला पहिला परराष्ट्र दौरा केला.

अ) मॉरिशस ब) मालदीव क) नेपाळ ड) भूतान

87. 1 वही आणि 1 पुस्तक यांची किंमत ... आहे. वही आणि पुस्तक यांची एकत्र गुणोत्तर 1:4 आहे. तर वहीची किंमत किती रूपये आहे?

अ) 15 रू ब) 10 रू क) 12 रू ड) 8 रू

88. प्रत्येक तुकडा 8 मिटर प्रमाणे एका तारेचे 30 तुकडे केले. जर प्रत्येक तुकडा 10 मिटर लांबीचा असतो तर तारेचे किती तुकडे?

अ) 32 ब) 28 क) 24 ड) 25

89. वडील आणि मुलगा यांच्या वयातील अंतर a-b आणखी 10 वर्षानंतर त्याच्या वयातील अंतर किती?

अ) a+b+10 ब) a-b+20 क) a-b ड) [a-b] x 10

90. usb म्हणजे काय?

अ) United Serial Bus ब) Universal Smart Bus

क) Universal Serial Bus ड) United smart Bus

91. अष्टविनायकापैकी ....... स्थान पुणे जिल्ह्यात नाही.

अ) तीन ब) चार क) दोन ड) पाच

92. 13 मिटर व 7 सेंटी मिटर = किती किलोमीटर

अ) 0.1307 किमी ब) 0.001307 किमी

क) 0.01307 किमी ड) 1.1307 किमी

93. एक भिंत बांधण्यास 6 गवंड्यांना 14 दिवस लागतात. काही कारणामुळे त्यातील 2 गवंडी निघुन गेले. तर बाकीचे गवंडी ते काम किती दिवसात पुर्ण करतील?

अ) 21 दिवस ब) 20 दिवस क) 16 दिवस ड) 17 दिवस

**94. सांकेतिक भाषेत FRIEND हा 435729 असा लिहितात तर FIND तर हा शब्द कसा लिहाल?**

अ) 4567 ब) 4559 क) 4292 ड) 4529

**95. 48 व 72 यांचा मसावि कोणता आहे?**

अ) 24 ब) 44 क) 72 ड) 12

**96. 90 गुंठेच्या केळीची बाग, 70 गुंठे द्राक्ष बाग व 90 गुंठे असणाऱ्या शेतकऱ्याकडे किती एकर शेती आहे?**

अ) 5 एकर 40 गुंठे ब) 6 एकर 10 गुंठे

क) 4 एकर 20 गुंठे ड) 4 एकर 10 गुंठे

**97. एका विद्यार्थ्याच्या 5 विषयातील गुण 40, 42, 80, 86, 30 असे आहेत तर त्याचे सरासरी गुण किती?**

अ) 56.5 ब) 66.35 क) 55.6 ड) 56.6

**98. एक स्कुटर 10 लिटरमध्ये 280.2 किमी जाते. 168 किमी जाण्याकरिता किती पेट्रोल लागेल?**

अ) 5.5 लि. ब) 6.6 लि. क) 6 लि. ड) 6.4 लि.

**99. ब्रम्हदेशाच्या थिबा राज्याचा राजवाडा महाराष्ट्रात कुठे आहे?**

अ) गडचिरोली ब) सिंधुदूर्ग क) रत्नागिरी ड) कुडाळ

**100. एका माणसाची ओळख करून देताना एक स्त्री म्हणाली, त्याची पत्नी माझ्या वडिलांची एकुलती एक मुलगी आहे. तर त्या माणसाचे त्या स्त्रीशी नाते काय?**

अ) काका ब) भाऊ क) पती ड) मामा

# उत्तर तालिका

| Q | Ans | Q | Ans | Q | Ans | Q | Ans |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | क | 26 | ड | 51 | ब | 76 | अ |
| 2 | ब | 27 | क | 52 | क | 77 | अ |
| 3 | क | 28 | क | 53 | क | 78 | क |
| 4 | अ | 29 | ड | 54 | ड | 79 | अ |
| 5 | अ | 30 | क | 55 | ड | 80 | ड |
| 6 | अ | 31 | ब | 56 | ब | 81 | ब |
| 7 | ब | 32 | ड | 57 | अ | 82 | क |
| 8 | क | 33 | क | 58 | अ | 83 | ब |
| 9 | ड | 34 | क | 59 | ड | 84 | ब |
| 10 | अ | 35 | क | 60 | ब | 85 | ड |
| 11 | अ | 36 | ब | 61 | ड | 86 | ड |
| 12 | अ | 37 | क | 62 | ब | 87 | - |
| 13 | अ | 38 | ड | 63 | ब | 88 | क |
| 14 | अ | 39 | क | 64 | ड | 89 | क |
| 15 | ब | 40 | क | 65 | क | 90 | क |
| 16 | अ | 41 | अ | 66 | अ | 91 | अ |
| 17 | क | 42 | ड | 67 | क | 92 | क |
| 18 | ड | 43 | ब | 68 | ड | 93 | अ |
| 19 | अ | 44 | ब | 69 | क | 94 | ड |
| 20 | ब | 45 | क | 70 | क | 95 | अ |
| 21 | ब | 46 | ब | 71 | क | 96 | ब |
| 22 | अ | 47 | ड | 72 | ब | 97 | क |
| 23 | क | 48 | क | 73 | ड | 98 | क |
| 24 | ब | 49 | क | 74 | क | 99 | क |
| 25 | ड | 50 | ड | 75 | क | 100 | क |